MHBI080002932011

## नि.दि.दा.क्र.२३४/२०११ मधील निशाणी क्र.८७ खालील आदेश

वादीने सदरचा अर्ज त्याच्याविरूद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी व त्याला पुरावा देण्यास परवानगी मिळण्यासाठी केलेला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरच्या प्रकरणात त्याने पुरावा दिला असून पुरावा बंद करण्याबाबत पुरसीस दिली आहे. त्यानंतर सदरच्या दाव्याचे कामकाज प्रतिवादींचे पुराव्यासाठी प्रलंबीत होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने काही मिळकती इतर प्रतिवादींना नोंदणीकृत खरेदीखताने हस्तांतरीत केल्या आहेत. वादीने त्याबाबत दाव्यामधे दुरुस्ती केली आहे. प्रतिवादींनी सदरचे खरेदीखत करुन घेतल्यानंतर वादीच्या काही क्षेत्रावर सदरचा दावा चालू असताना अतिक्रमण केले आहे. वादीने त्याबाबत दाव्यात दुरुस्ती केली आहे. सदरच्या संबंधीत दुरुस्तीबाबत वादीला पुरावा देणे आवश्यक आहे. त्याला जर पुराव्याची संधी मिळाली नाही तर त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये त्यांनी वादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्यांनी म्हटले आहे की, वादीने अनेक प्रकारचे अर्ज सदरच्या प्रकरणात दिले असून प्रकरणात विनाकारण विलंब केलेला आहे. अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे असे त्यांनी म्हटले आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादीचे विरुद्ध झालेला पुरावा बंद करणेबाबतचा आदेश रद्द करणे व त्याला पुराव्याची परवानगी देणे आवश्यक आहे काय ? | ......होय |
| २. आदेश काय ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ बाबत

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री. कुलकर्णी व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. तौर यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबधीत दस्तऐवज पाहिले. वादीने त्याला स्वतःला व त्याचा साक्षीदार शेख रज्जाक याला तपासल्यानंतर ता.१०.०८.२०१५ रोजी त्याला आणखी पुरावा दयायचा नाही अशी नि.क्र.४३ वर पुरसीस दिलेली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने त्याचे पुराव्याचे शपथपत्र ता.१०.०९.२०१५ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर सदरच्या दाव्याचे कामकाज प्रतिवादी क्र.१ च्या उलटतपासणीसाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ हा मयत झाल्यामुळे त्याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाव्याचे कामकाज प्रलंबित होते. त्यानंतर ता.०५.०३.२०१९ रोजी वादीने नि.क्र.७१ वर दावा दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे. वादीने सदरचे दावा दुरुस्तीचे अर्जात कथन केले आहे की सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या मालकीची ८० आर जमीन प्रतिवादी क्र.२ चे वारसांना विक्री केली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ च्या वारसांनी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुचा बांध पूर्ण फोडून त्याच दिवशी

वादीचे मालकी व ताब्यातील मिळकतीपैकी दक्षिण बाजूने दोन गुंठे जमीनीवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे वादीला प्रतिवादी क्र.२ चे वारसांनी केलेले अतिक्रमण दुर करुन दोन गुंठे जमीनीचा ताबा परत मिळणे आवश्यक आहे. तसेच वादीला दाव्याच्या विनंती कलमामध्ये अतिक्रमण दुर करुन त्या जागेचा ताबा मिळण्यासाठी व ताबा मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ चे वारसांनी वादीचे मालकी व ताब्याला कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये असा कायमचा मनाई हुकूम मिळण्याची विनंती केली आहे.

५. वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज ता.१९.०७.२०१९ रोजी मंजूर करण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे वादीने मुळ दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. वादीला सदरच्या संबंधीत दुरुस्तीबाबत पुरावा दयायचा आहे. वादीने कथन केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे हस्तांतरण प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना वादीचा पुरावा झाल्यानंतर केले आहे. वादीचा पुरावा संपल्यानंतर व प्रतिवादी क्र.१ चा पुरावा सुरु असताना सदरचे तथाकथीत हस्तांतरणाची व अतिक्रमणाची घटना घडल्यामुळे वादीला त्याबाबत पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. वादीने त्याला अतिरीक्त पुरावा देण्यास अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचे दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व वादीला त्याची बाजू मांडणेसाठी त्याच्याविरूध्द पुरावा बंदचा झालेला आदेश रद्द होणे व त्याला अतिरीक्त पुरावा देण्यास संधी देणे आवश्यक आहे. वादीला जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे वादीचा पुरावा बंद झाल्याचा आदेश रद्द करणे व त्याला अतिरीक्त पुराव्यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ बाबत

६. मी वर नमुद केल्याप्रमाणे वादीने सदरचे दाव्यात ता.१९.०७.२०१९ रोजी नि.क्र.७१ वरील आदेशान्वये तथाकथीत दुरुस्ती केली आहे. परंतु त्याबाबत पुरावा देण्याचा अर्ज हा खुप उशीरा म्हणजेच ता.२०.०२.२०२४ रोजी दिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींना त्रास सहन करावा लागला आहे. सदरचे प्रकरण हे दहा वर्षांपेक्षा जास्त जुने कालावधीचे आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींना खर्चाची रक्कम देणेचे अटीवर सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र. ८७ चा अर्ज वादीने प्रतिवादींना एकूण खर्चाची रक्कम रुपये ५०००/- देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

GHANWAT SOPAN DASHRATH Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH Date: 2024.07.12 17:34:11 +0530

दिनांक – १२/०७/२०२४

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माजलगाव

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | ए.एम.दशरथ |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १२/०७/२०२४ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १२/०७/२०२४ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १२/०७/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १२/०७/२०२४ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – १२/०७/२०२४

(ए.एम्.दशरथ)
लघुलेखक ग्रेड – १,
जिल्हा न्यायालय, माजलगाव